क्र: प्रप-१६१३/अराजपनित/३-२०१४/प्रशा - २/१३८२

अर्थ व सांख्यिकी संचालनालय, महाराष्ट्र शासन,
प्रशासकीय इमारत, मुंबई उपनगर जिल्हा,
८ वा मजला,शासकीय वसाहत,वांद्रे (पुर्व),
मुंबई - ४०००८१
दिनांक: 24 NOV 2014

परिपत्रक

**विषय:- स्पर्धा परिक्षा/इतर परिक्षा/मुलाखती इ.साठी परवानगीसाठी व ना-हरकत प्रमाणपत्र मिळणे बाबत.**

स्पर्धा परिक्षांना अथवा इतर परिक्षांना बसण्यास परवानगी मिळणेबाबतचे अर्ज मोठ्या प्रमाणात संचालनालयास प्राप्त होतात. परंतु बरेचदा सदर अर्जातून परिक्षेबाबतची योग्य ती माहिती प्राप्त होत नाही. त्यामुळे परिक्षेस बसण्यास मान्यता व ना-हरकत प्रमाणपत्र देण्यास विलंब होतो.

२/- त्यामुळे यापुढे सर्व अधिकारी/कर्मचा-यांनी स्पर्धा परिक्षा/इतर परिक्षा/मुलाखती इ.साठी परवानगीसाठी अर्ज करताना या सोबत जोडलेल्या प्रपत्र-अ मधे दिलेल्या नमुन्यातील माहितीसह अर्ज करावा. परवानगी मागणारा अर्ज, परिक्षेचा अर्ज सादर करण्यापूर्वी करणे अपेक्षीत आहे. विहीत नमुन्यात नसलेले अर्ज ग्राह्य धरले जाणार नाहीत याची नोंद घ्यावी.

३/- अर्थ व सांख्यिकी संचालनालयाच्या अधिपत्याखालील कार्यालयात कार्यरत असलेल्या अन्वेषक/ लिपिक टंकलेखक/वाहनचालक व शिपाई यांनी संबंधीत प्रादेशिक कार्यालयांकडे व इतर संवर्गातील अधिकारी/कर्मचारी यांनी मुख्य कार्यालयाकडे अर्ज करावेत.

४/- अर्थ व सांख्यिकी संचालनालयाच्या अधिपत्याखाली नसलेल्या कार्यालयात कार्यरत असलेल्या अधिकारी/कर्मचा-यांनी कार्यालय प्रमुखामार्फत मुख्य कार्यालयाकडे अर्ज करावेत.

५/- वेगवेगळ्या पदांसाठी एकच जाहिरात असल्यास एकच अर्ज करावा तथा वेगवेगळ्या जाहिराती असल्यास स्वतंत्र अर्ज करावेत.

६/- सर्व कार्यालय/शाखा प्रमुखांनी सदर परिपत्रक आपल्या कार्यालय/शाखेतील सर्व कर्मचा-यांच्या निदर्शनास आणुन द्यावे.

७/- सदर परिपत्रक संचालनालयाच्या http://mahades.maharashtra.gov.in या संकेतस्थळावरही उपलब्ध आहे.

(प्र.मो.पोहरे)
उपसंचालक(प्रशासन)
अर्थ व सांख्यिकी संचालनालय, मुंबई

सहपत्र:- वरील प्रमाणे

प्रत: माहिती तथा योग्य त्या कार्यवाहीसाठी.
१) सहसंचालक, अर्थ व सांख्यिकी संचालनालय, प्रादेशिक कार्यालय, नवी मुंबई/पुणे/औरंगाबाद/नाशिक/नागपुर/अमरावती
२) जिल्हा नियोजन अधिकारी, जिल्हा नियोजन समिती, जिल्हाधिकारी कार्यालय (सर्व)
३) जिल्हा सांख्यिकी अधिकारी, जिल्हा सांख्यिकी कार्यालय (सर्व)

प्रत:

१. अपर संचालक (सर्व)
२. सह संचालक (सर्व) [] अर्थ व सांख्यिकी संचालनालय,
३. प्रशासन शाखा-१/२/३/४ [] मुख्य कार्यालय, मुंबई
४. सर्व शाखा प्रमुख

१६९१५

## प्रपत्र-अ

स्पर्धा परिक्षांना व इतर परिक्षांना बसण्यास परवानगी मिळण्यासाठी करावयाच्या अर्जाचा नमुना

| | | |
|---|---|---|
| १. | अधिकारी/कर्मचा-याचे नावः- | |
| २. | धारण केलेले पद व वेतन श्रेणीः- | |
| ३. | भ्रमणध्वनी क्रमांकः- | |
| | ईमेल आय डीः- | |
| ४. | सध्या कार्यरत असलेल्या कार्यालयाचे नावः- | |
| | पत्ताः- | |
| | दुरध्वनी क्रमांकः- | |
| ५. | परवानगी मागण्यात आलेल्या पदाबाबतचा तपशिल<br>१)जाहिरात दिनांकः- | |
| | २) पदाचे नावः-<br>(ज्या पदासाठी अर्ज केला आहे ते पद) | |
| | ३) ज्या कार्यालयात/आस्थापनेवर सदर पद आहे त्या कार्यालयाचे नावः- | |
| | ४) आस्थापना/कार्यालयाचे स्वरूप (शासकिय/निम शासकिय/खाजगी) - | |
| | ५) अ) शासकिय असल्यास पदाचा गट [गट(अ/ब/क/ड)] -<br>ब) पदाची वेतन श्रेणीः- | |
| | ६) निवडीची पद्धतः-<br>[१) फक्त परिक्षा २) परिक्षा व मुलाखत ३) परिक्षा/मुलाखत व शारिरीक चाचणी/ व्यवसाय चाचणी ४) फक्त मुलाखत ५) परिक्षा व मुख्य परिक्षा६) मुलाखत व शारिरीक चाचणी/व्यवसाय चाचणी ७) इतर | |
| | ७) १) परिक्षेचा अंदाजित दिनांकः-<br>२) मुलाखतीचा अंदाजित दिनांक<br>३) शारिरीक चाचणी/व्यवसायः-<br>चाचणीचा अंदाजित दिनांकः- | |
| | ८) परिक्षा घेणा-या संस्थेचे नावः- | |

अधिकारी/कर्मचा-याची सही

कार्यालय प्रमुखाचे अभिप्राय

कार्यालय प्रमुखाची सही

टिपः- अर्थ व सांख्यिकी संचालनालयाच्या अधिपत्याखाली नसलेल्या कार्यालयात कार्यरत असलेले अधिकारी/कर्मचारी कार्यालय प्रमुखाच्या अभिप्रायाशिवाय मुख्य कार्यालयास थेट अर्ज करू शकतात.